# भाजपाला सुखाची आणि अय्याशीची चटक लागली !!

सांज दैनिक बीड RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

वास्तवची २१ वर्षे

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

स्क्रीन रिडरचा बादशहा

● बीड ● सोमवार, दिनांक १८ मे २०२६ ● वर्ष २१ वे ● पाने : ४ http ://epaper.beedvastav.com Email : beedvatsav@gmail.com ● किंमत ३ रुपये


**वृत्त शेवटच्या पानावर**

**भर कार्यक्रमात महसूलमंत्र्यांना कागदानं वारा! जनता दरबारातील ‘तो’ व्हिडिओ चर्चेत**

# मुंडे आणि पटेलांनी अजित पवारांचं डोकं फिरवलं होतं !!

- अजित पवारांचा राष्ट्रवादी किंवा शिंदेंची शिवसेना हे पक्ष नाहीयत ते निवडणूक आयोगाच्या माध्यमातून तयार झालेले गट !!
- शरद पवारांचंही म्हणण होतं की, अजित पवारांचं डोकं फिरवण्यात जे प्रमुख लोक होते, त्यात धनंजय मुंडे, प्रफुल्ल पटेलसारखी लोक होते !!
- या महाराष्ट्राच्या आणि देशाच्या आर्थिक नाड्या भाजपाच्या हातात आहेत, त्यामुळे साहजिकच येथील जनता गरीब आहे, यात शंका नाही !!

## राष्ट्रवादीतील संघर्षाबाबत संजय राऊतांचा मोठा दावा तर प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, धनंजय मुंडेंवर टीका

**मुंबई : प्रतिनिधी**
**राष्ट्रवादी काँग्रेसचे दिवंगत नेते अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या राजकीय भविष्याची चिंता निर्माण झाली आहे. महापालिकांच्या निवडणुकांनंतर हे दोन्ही पक्ष एकत्र येणार असल्याची चर्चा होती. मात्र, अजित पवारांच्या निधनानंतर ही चर्चा गुंडाळण्यात आली. आता पुन्हा एकदा या चर्चेला जोर आला आहे. परिणामी प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे यांचे पक्षांतर्गत असलेले वाद आता चव्हाट्यावर येऊ लागले आहेत. यावरून शिवसेना (ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी धनंजय मुंडे, प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांच्यावर टीका केली. आज त्यांनी खूप दिवसांनी माध्यमांशी संवाद साधला.**



### अजित पवार वगैरे पक्ष नाहीयत ते गट होते, लोक फुटले, दबावाखाली बाजूला गेले !!

● राष्ट्रवादी काँग्रेस ( अजित पवार ) पक्षातील अंतर्गत वादाबाबत संजय राऊतांना विचारलं असता ते म्हणाले, “अजित पवारांचा राष्ट्रवादी किंवा शिंदेंची शिवसेना हे पक्ष नाहीयत . अजित पवार असतानाही हा कधीच पक्ष नव्हता . निवडणूक आयोगाच्या माध्यमातून हे तयार झालेले गट आहेत . मूळ पक्ष हा शरद पवारांचा आणि उद्धव ठाकरेंचा आहे . आता त्यावर ३० जुलैला सुनावणी आहे . बाकी अजित पवार वगैरे पक्ष नाहीयत . ते गट होते . लोक फुटले, दबावाखाली बाजूला गेले .

### अजित पवारांचं डोकं फिरवण्यात धनंजय मुंडे, प्रफुल्ल पटेलांसारखी लोक होते !

“पक्षांना विचारधारा आणि भूमिका असते . या दोन पक्षाकडे आहे का ? शिंदेची विचारधारा बाळासाहेब ठाकरे आणि अजित पवारांच्या पक्षाची विचारधारा शरद पवारांच्या पक्षासारखी आहे”, असंही ते म्हणाले . दरम्यान प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे हे पार्थ पवार यांच्यावर नाराज असून त्यांची तक्रार शरद पवारांकडे करण्यात आली असल्याची चर्चा आहे . त्यावर संजय राऊत म्हणाले, “मला माहीत नाही . ही त्यांच्या कर्माची फळं आहेत . शरद पवारांचंही हे म्हणण होतं की अजित पवारांचं डोकं फिरवण्यात जे काही प्रमुख लोक होते, त्यात धनंजय मुंडे, प्रफुल पटेलसारखी लोक होते . ही त्यांच्या कर्माची फळं आहेत .”

### भाजपाला सुखाची आणि अय्याशीची चटक लागली!

● यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या काटकसरीच्या आवाहनावरही टीका केली . ते म्हणाले, “भाजपाला सुखाची आणि अय्याशीची चटक लागली आहे . त्यांना ढोंग करण्याची सवय लागली आहे . या महाराष्ट्राच्या आणि देशाच्या आर्थिक नाड्या भाजपाच्या हातात आहेत . त्यामुळे जनता गरीब आहे . ही चिंता त्यांनी नेदरलँडमधून व्यक्त केली .

● इथे या ना, इथल्या देशाची संस्कृती रसातळाला चालली आहे . नेदरलँडचं पाहायला त्यांचं राष्ट्र समर्थ आहे .”

## बीड बायपासला अ‍ॅड. सुभाष राऊत यांच्या नेतृत्वाखालील शेतकऱ्यांनी केला भव्य रास्ता रोको

बीड : प्रतिनिधी
बीड शहरा लगत असलेल्या बीड बायपास वरील इमामपूररोड येथील सर्विस रोड व स्लिप रोड 600 मीटर वाढवण्या संदर्भात वारंवार पत्र व्यवहार करूनही काम न झाल्यामुळे बीड बायपासला महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य अँड सुभाष राऊत, रामभाऊ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील या परीसरातील सर्व शेतकरी बांधवानी लोकशाही मार्गाने सोमवार दि . 18 मे 2026 रोजी सकाळी 10 .00 वा . भव्य रस्ता रोको करण्यात आला .

सोलापूर ते धुळे राष्ट्रीय महामार्ग क्र . 52 हा अतिशय चांगल्या दर्जाचा रस्ता सन 2019-20 मध्ये बी .ओ .टी . तत्वावर पूर्ण करण्यात आलेला आहे . तरी हा रस्ता करत असतांना जुना सोलापूर-धुळे-मांजरसुंबा येथुन येणारा रस्ता छत्रपती संभाजी राजे चौक ते इमामपूर रोड इथपर्यंत रोडची उंची जास्त आहे व संबंधीत क्षेत्रात रोडच्या दोन्ही बाजुने शेतकऱ्यांच्या जमिनी आहेत, त्या रोडची उंची असल्यामुळे शेती करता येत नाही .

सध्या इमामपूर रोडला स्लिप रोड व सींस रोड मंजूर असून त्याचे काम





चालू आहे, तसेच छत्रपती संभाजी राजे चौक बार्शी रोड येथे पण स्लिप रोड व सर्व्हीस रोड मंजूर असून त्याचे पण काम चालू आहे . याच रोडवर समनापूर कडे जाणारा 20 फुटाचा रस्ता आहे, इमामपूर रोड ते छत्रपती संभाजी राजे चौक या स्लिप रोडला जर 600 मीटर आंतर वाढवले तर शेतकऱ्यांना शेती करण्यास व कोल्हारवाडी, समनापूर, इमामपूर, शिंदे वस्ती या गावांना याचा फायदा होईल . यासाठी वारंवार या संदर्भात पत्र व्यवहार करून सुध्दा यावर लक्ष दिले नाही, म्हणून आज या परिसरातील सर्व शेतकऱ्यांनी सोमवार दि . 18 मे 2026 रोजी सकाळी 10 .00 वाजता बीड बायपास वरील संबंधीत जागेवर रस्ता भव्य रोको आंदोलन केले याबाबत मा . प्रकल्प सचांलक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण छत्रपती संभाजीनगर यांना निवेदन देण्यात आले असून या भव्य रस्ता रोकोस महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य अ‍ॅड . सुभाष राऊत, रामभाऊ शिंदे, वामन लिंबाजी शिंदे, दिगंबर तुलसीराम शिंदे, अंकुश तुळशीराम शिंदे, मच्छिंद्र बाबुराव वाणी, रवींद्र मच्छिंद्र माने, जयदीप पांडुरंग पवार, भगवान लिंबाजी शिंदे, प्रविण पालीमकर, सातीराम ढोले, त्रिंबक कानतोडे, आशोक ढोले, राजाभाऊ ढोले यांच्या सह या परिसरातील अनेक शेतकरी बांधव उपस्थित होते .

**भगवान पुरुषोत्तमाच्या दर्शनासाठी लाखोंची गर्दी** ➤ पहिल्याच दिवशी पुरुषोत्तमपुरीत भाविकांचा महापूर

# जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते महापूजेनं पुरुषोत्तम मास उत्सवाला प्रारंभ

## ➤ दागिने चोरीच्या घटनांनी भाविकांमध्ये चिंता- उन्हापासून संरक्षणासाठी मंडप उभारण्याची मागणी

➤ **माजलगाव / अरविंद ओव्हाळ** देशातील एकमेव मानल्या जाणाऱ्या पुरुषोत्तमपुरी येथील भगवान पुरुषोत्तमाच्या पुरुषोत्तम मास उत्सवाला रविवारी मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला . सकाळी नऊ वाजता जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते महापूजा संपन्न झाली . यावेळी आमदार प्रकाश सोळंके, उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले, तहसीलदार संतोष रुईकर, बाजार समितीचे सभापती जयदत्त





नरवडे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते .पुरुषोत्तम मासाच्या पहिल्याच दिवशी तसेच रविवारची सुट्टी असल्याने राज्यासह परराज्यातून लाखो भाविकांनी पुरुषोत्तमपुरी येथे गर्दी केली . पहाटे तीन वाजल्यापासूनच पुरुषोत्तमपुरीकडे जाणाऱ्या मार्गांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या . सकाळी नऊ वाजेपर्यंत हजारो भाविक दर्शनबारीत उभे असल्याचे चित्र पाहायला मिळाले .महापूजेनंतर भाविकांसाठी दर्शन सुरू करण्यात आले . वाढती गर्दी लक्षात घेता मंदिर प्रशासनाच्या वतीने दर्शन व वाहतूक नियोजनासाठी विशेष व्यवस्था करण्यात आली होती . मात्र, प्रचंड गर्दी आणि वाढत्या उन्हाच्या तीव्रतेमुळे प्रशासनाची गर्दी नियंत्रण करताना मोठी दमछाक झाली .दरम्यान, गर्दीचा फायदा घेत काही महिलांच्या अंगावरील दागिने चोरीस गेल्याच्या घटना घडल्याने भाविकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले . यामुळे सुरक्षा व्यवस्थेबाबत अधिक दक्षता घेण्याची मागणी पुढे येत आहे .तसेच, उन्हाचा त्रास कमी करण्यासाठी दर्शनमार्गावर आणि प्रमुख रस्त्यांवर मंडप उभारावेत, पिण्याच्या पाण्याची अधिक व्यवस्था करावी, अशी मागणी अनेक भाविकांनी मंदिर प्रशासनाकडे केली आहे .

### महत्वाचे ठळक मुद्दे

● जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते सकाळी महापूजा ● राज्यासह परराज्यातून लाखो भाविकांची उपस्थिती ● पहाटेपासूनच वाहनांच्या रांगा आणि दर्शनासाठी गर्दी ● मंदिर प्रशासनाची गर्दी नियोजन करताना दमछाक ● काही महिलांचे दागिने चोरीस गेल्याच्या घटना ● भाविकांकडून रस्त्यावर मंडप उभारण्याची मागणी

# आजचे राशि भविष्य

## मेष रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्‌भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

## वृषभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## मिथुन रास

➤ या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्‌भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

## कर्क रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## सिंह रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कन्या रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

## तूळ रास

➤ आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

## वृश्चिक रास

➤ आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

## धनु रास

➤ आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वतःच्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## मकर रास

➤ या दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कुंभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो.

## मीन रास

या राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल. आजचा व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते.

# चिंचगव्हाण फाट्यावर गतिरोधक बसविण्याची मागणी

## नॅशनल हायवे ६१ वरील वाढत्या अपघातांमुळे परिसरात चिंतेचे वातावरण

➤ **माजलगाव / प्रतिनिधी :** माजलगाव-गेवराई नॅशनल हायवे क्रमांक ६१ वरील चिंचगव्हाण फाट्यावर वारंवार होत असलेल्या अपघातांमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या ठिकाणी तातडीने गतिरोधक बसवावेत, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

माजलगाव शहरालगत असलेला चिंचगव्हाण फाटा हा अत्यंत वर्दळीचा परिसर मानला जातो. नॅशनल हायवे ६१ मार्गाने मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, जालना, बुलढाणा आदी प्रमुख शहरांकडे वाहतूक होत असल्याने या मार्गावर दिवस-रात्र वाहनांची मोठी रहदारी असते.

विशेष म्हणजे, याच फाट्यावरून ब्राम्हगावकडे जाणारा टर्न असल्याने येथे वाहनचालकांना अचानक वेग कमी करून वळण घ्यावे लागते. मात्र, मागून येणारी भरधाव वाहने वेळीच नियंत्रणात न आल्याने अपघात घडत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

स्थानिकांच्या माहितीनुसार, मागील काही दिवसांत या ठिकाणी अनेक लहान-मोठे अपघात झाले आहेत. त्यामुळे भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता



### महत्वाचे ठळक मुद्दे

● चिंचगव्हाण फाट्यावर वारंवार अपघात होत असल्याची नागरिकांची तक्रार ● ब्राम्हगावकडे जाणाऱ्या टर्नवर गतिरोधकाची गरज ● मुंबई, पुणे, नाशिकसह प्रमुख शहरांना जोडणारा महत्त्वाचा मार्ग ● भरधाव वाहनांमुळे अपघातांचा धोका वाढला ● नॅशनल हायवे अथॉरिटीने तातडीने दखल घेण्याची मागणी

येत नाही. "वाहनांचा वेग नियंत्रित करण्यासाठी या टर्नवर गतिरोधक बसविणे अत्यंत आवश्यक आहे," अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

नागरिकांचे म्हणणे आहे की, जर या ठिकाणी गतिरोधक उभारण्यात आले तर वाहनांचा वेग कमी होईल आणि अपघातांवर मोठ्या प्रमाणात नियंत्रण मिळवता येईल. विशेषतः रात्रीच्या वेळी भरधाव वाहनांमुळे अपघातांचा धोका अधिक वाढत असल्याचेही सांगितले जात आहे.

त्यामुळे नॅशनल हायवे अथॉरिटीने या मागणीची तातडीने दखल घेऊन चिंचगव्हाण फाट्यावर आवश्यक सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी मागणी परिसरातील नागरिकांतून जोर धरत आहे.

# "बुडतीचे पाय, डोहाकडे..!





### विशेष



**भारत बडे**

सतत जनतेच्या सेवेसाठी तत्पर असणारे धडाकेबाज निर्णय घेऊन, सर्वसामान्य जनतेला विविध योजनेच्या माध्यमातून विकासाची गंगा शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्यासाठी वेळप्रसंगी अधिकाऱ्यांना खडसावणारे..!दिलदार स्वभावाचे अष्टपैलू असे, व्यक्तिमत्व महाराष्ट्राने 28 जानेवारी 2026 ला अजित दादा पवार यांच्या रूपाने गमावले. सतत सर्वसामान्य जनतेच्या विकासाचा ध्यास, वसा हाती घेतलेल्या दादांचे अकाली निधन झाले .अर्धवट राहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी सुनेत्राताई पवार यांनी दु:खाचा डोंगर बाजूला सारत, अजित दादांचे अर्धवट राहिलेले विकासाचे वर्तुळ पूर्ण करण्यासाठी अगदी..!तिसऱ्याच्या दिवशी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेण्यासाठी मोठ्या जड अंत:करणाने पाऊल टाकत दादांचा विकासाचा वसा व वारसा हाती घेतला .दादांची सर्व कर्तव्य आणि हक्क सुद्धा सुमित्रा ताई पवारांनी यांनाच निभवावी लागणार .दादांनी संपूर्ण महाराष्ट्रामध्ये वाडी-वस्ती, दर्या- डोंगरांमध्ये जोडलेला प्रत्येक कार्यकर्ता आणि त्या कार्यकर्त्यावर केलेले जिवापाड प्रेम सर्वश्रुत आहे .हे सर्व साम्राज्य टिकवून ठेवणे हे मोठे...!आव्हान सध्याच्या घडीला सुनेत्राताई पवार यांच्या समोर असताना देखील, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष( अजित पवार गट )अबाधित ठेवून पक्षावर असलेला कार्यकर्त्यांचा व जनतेचा विश्वास जपावा लागणार. त्यांना दादांची उणीव भासू देता कामा नये .अशी अनेक संकटे सध्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या सर्वस्व असणाऱ्या तथा राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्यासमोर उभी आहेत. पक्षांमधील ज्येष्ठ नेत्यांचे अनुभव आणि मार्गदर्शन, युवा नेत्यांची ऊर्जा यांचा त्रिवेणी संगम साधत दादांचे असणारे स्वप्न पूर्ण करण्यासाठी ज्येष्ठ-युवा नेते व सर्व सामान्य कार्यकर्त्यांची सांगड घालण्याची परिस्थिती निर्माण झालेली असताना. अशा अवस्थेमध्ये पक्षाच्या अंतर्गत केल्या गेलेल्या नियुक्तीने पक्षामध्ये अस्थिरतेचे वातावरण निर्माण झाले आहे .कारण प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ, हसन मुश्रीफ, धनंजय मुंडे, दिलीप वळसे पाटील या अनुभवी नेत्यांकडे पक्षाच्या नवीन कार्यकारिणीमध्ये महत्त्वाच्या जबाबदाऱ्या देऊन, पक्ष संघटना आणि बळकटीकरणासाठी त्यांच्या मार्गदर्शनाचा, अनुभवाचा जास्तीत जास्त वापर होण्यासाठी त्यांच्याकडे पक्षाने जबाबदारीची पदे देणे गरजेचे होते. विरोधकाबरोबर मित्रपक्षशीही पक्षविस्ताराची आणि मजबुतीकरण पक्ष संघटना सशक्त करण्याचे आव्हान प्रत्येक पक्षा समोर उभे असते .यावरच प्रत्येक पक्षाचे जनतेच्या दारामध्ये लोकशाहीचा विजय होतो .परंतु, राष्ट्रवादी पक्षच्या नवीन कार्यकारिणी मध्ये धक्कादायक तंत्राचा वापर करत सर्वकाही महत्त्वाची पदे "हम और हमारे दो बच्चे "अशीच काहीशी अवस्था राष्ट्रवादी कॉंग्रेस( अजित पवार )या पक्षाची झाल्यासारखे दिसत आहे .ज्या आणीबाणीच्या स्थितीमध्ये पक्षाला खऱ्या अर्थाने अनेक निवडणुकीला सामोरे गेलेला अनुभव..! महाराष्ट्राचा कोपराना-कोपरा माहित असणारे व जनतेचा विश्वास संपादन करून, अनेक सभेचे विजयामध्ये रूपांतर करून पक्षाला सत्तेच्या सिंहासनावर बसवणारे...!तसेच दादाच्या प्रत्येक निर्णयामध्ये सुखदु:खाच्या व कठीण प्रसंगाच्या वेळी खंबीरपणे दादांच्या पाठीमागे सावलीसारखे उभे राहणारे..!प्रफुल्ल पटेल, छगन भुजबळ, धनंजय मुंडे, सुनील तटकरे, हसन मुश्रीफ असे, अनेक कितीतरी अनुभवी नेतृत्वाच्या फळीची गरज होती. त्याच काळामध्ये पक्षाने राष्ट्रीय कार्यकारणी मध्ये बदल करून ज्यांनी "बारामती ते पुणे आणि पुणे ते बारामती" असाच प्रवास केला .ज्यांना राज्याच्या भौगोलिक आणि ऐतिहासिक ज्ञानाची व महाराष्ट्रातील जनतेच्या प्रश्नांची जाण आणि ज्ञान नाही. अशा स्वत:च्याच दोन युवराजांच्या खांद्यावर पक्षांची जबाबदारी देऊन, पक्षातीलच ज्यांनी आपले उभे आयुष्य पक्षाच्या जडण-घडणीसाठी वेचले अशा अनुभवी नेत्यांनाच पक्षाच्या महत्त्वाच्या कार्यकारणी मधून विश्वासात न घेताच...! बाहेरचा रस्ता दाखवल्यामुळे, अजित दादांच्या जाण्याने पक्षाची न, भरून येणारी पोकळी निर्माण झाली आहे. पक्षातील नेते आणि कार्यकर्त्यांना दादांची पावलोपावली आठवण येत आहे. दादांनी जीवापाड प्रेम करून कार्यकर्त्यांचे संघटन मजबूत करत वाढवलेल्या पक्षाची सध्याची अवस्था " बुडतीचे पाय, डोहाकडे " काहीशी अशीच झाली आहे का ?या प्रश्नाचे उत्तर येणारा काळच देईल. कारण( आनंद परांजपे ) घरट्यामधून एक-एक पाखरे निघून जाता-जाता घरटे रिकामे कधी झाले हे..!ही कळणार नाही .हे मात्र निश्चित तूर्तास एवढेच..!

# ३० वर्षांपूर्वीचा सुवर्णकाळ : माणुसकी, आपुलकी आणि संस्कारांची जपणूक






### विशेष



**अरविंद ओव्हाळ**
निवासी संपादक

आज विज्ञानाने प्रचंड प्रगती केली, तंत्रज्ञान प्रत्येकाच्या हातात आले, जग जवळ आले; पण माणसं मात्र एकमेकांपासून दूर गेली, अशी खंत अनेकांच्या मनात दिसून येते. साधेपणा, प्रेम, आपुलकी आणि नात्यांची उब जपणारा जुना काळ आज अनेकांना आठवतो. त्या काळात पैसा कमी होता, साधने कमी होती, पण माणुसकी मात्र अफाट होती. म्हणूनच आजही लोक "ते दिवस वेगळेच होते" असे म्हणताना दिसतात.

पूर्वी लोकांकडे फारसे कपडे नव्हते, तरीही सभ्यता आणि संस्कार जपले जात होते. आज कपड्यांचे असंख्य प्रकार उपलब्ध आहेत, पण दिखाव्याच्या स्पर्धेत साधेपणा हरवत चालला आहे. समाज आधुनिक झाला, पण संस्कृतीचे मूल्य टिकवणे अधिक महत्त्वाचे बनले आहे.

त्या काळात प्रवासाची साधने मर्यादित होती. सायकल, एसटी किंवा क्वचित एखादी जीप एवढ्यावरच लोकांचे जीवन चालायचे. तरीही नातेवाईक, मित्रमंडळी एकमेकांना भेटण्यासाठी वेळ काढत असत. आज गाड्या, मोबाईल, इंटरनेट सर्व काही असूनही "वेळ नाही" हेच सर्वात मोठे कारण बनले आहे .पूर्वी गावातील प्रत्येक मुलगी ही संपूर्ण गावाची जबाबदारी मानली जायची. तिच्या सुरक्षिततेची काळजी संपूर्ण समाज घेत असे. आजच्या काळात मात्र शेजारपाजारातही असुरक्षिततेची भावना वाढताना दिसते. ही बदललेली सामाजिक मानसिकता चिंतेची बाब आहे. एकेकाळी वडीलधाऱ्यांना घरातील देवासमान मान दिला जायचा. त्यांच्या




### महत्वाचे ठळक मुद्दे

● जुन्या काळातील साधेपणा आणि संस्कार
● नात्यांमधील जिव्हाळा आणि माणुसकी
● आधुनिक जीवनशैलीमुळे वाढलेला दुरावा
● मोबाईल आणि तंत्रज्ञानामुळे बदललेले सामाजिक जीवन
● एकत्र कुटुंब व्यवस्था आणि शेजारधर्माची कमी झालेली परंपरा
● आधुनिकतेसोबत संवेदनशीलता जपण्याची गरज

अनुभवाला महत्त्व होते. आज अनेक ठिकाणी वृद्धाश्रमांची संख्या वाढत आहे. आधुनिकतेच्या धावपळीत नात्यांतील भावनिक आधार कमी होत चालल्याचे हे वास्तव आहे. पूर्वी खेळणी कमी होती, पण मैत्री भरपूर होती. मुलं मैदानात एकत्र खेळायची, भांडायची आणि पुन्हा हसत एकत्र यायची. आज मुलांकडे महागडी खेळणी आहेत, पण मोबाईलच्या पडद्यामागे त्यांचे बालपण अडकून पडले आहे .त्या काळात रस्त्यावरच्या जनावरांनाही लोक प्रेमाने भाकरी, चारा देत असत. माणुसकी इतकी जिवंत होती की दुसऱ्याच्या दु:खाची जाणीव प्रत्येकाला होत असे. आज मात्र अनेक गरीब, भुकेली माणसं रस्त्यावर झोपताना दिसतात आणि समाज त्याकडे सहज दुर्लक्ष करतो.

पूर्वी शेजारधर्म जपला जायचा. सण-समारंभ, दु:ख-सुख सर्व काही एकत्र साजरे होत असे. घरातील जेवण शेजाऱ्यांकडे पाठवले जायचे. आज ऑनलाइन अन्न मागवले जाते; पण त्यात प्रेमाची चव आणि नात्यांची ऊब हरवलेली दिसते. आजचा समाज प्रगत झाला आहे, यात शंका नाही. पण प्रगतीसोबत माणुसकी, प्रेम, आपुलकी, संस्कार आणि नाती यांची किंमतही जपली गेली पाहिजे. कारण खरा सुवर्णकाळ तोच असतो, जिथे माणूस माणसाशी जोडला जातो.

विशेष

# महिला मंडळ अधिकाऱ्यास अश्लील मेसेज, जीवे मारण्याची धमकी

## पैठण तालुकाध्यक्षाविरोधात गुन्हा दाखल

**पैठण / प्रतिनिधी :** विहामांडवा विभागातील महिला मंडळ अधिकाऱ्यास अश्लील मेसेज पाठवून मानसिक त्रास देणे, शासकीय कामासाठी दबाव टाकणे, सोशल मीडियावर बदनामी करण्याची धमकी देणे तसेच मुलीला ठार मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी पाचोड पोलीस ठाण्यात युवराज चावरे (रा. कोळीबोडखा, ता. पैठण) याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मंडळ अधिकारी विमल बाबासाहेब बांगर (वय ३५) यांनी १५ मे रोजी पाचोड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्या सध्या तहसील कार्यालय पैठण अंतर्गत विहामांडवा विभागात कार्यरत आहेत.

फिर्यादीत नमूद केल्यानुसार, आरोपी युवराज चावरे याने सुरुवातीला वर्तमानपत्रातील बातमीची कात्रणं व्हॉट्सअॅपवर पाठवून बदनामी करण्याचा प्रयत्न केला. तसेच "मी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचा तालुका अध्यक्ष आहे, माझे सर्व काम तुला करावे लागेल," असे सांगत शासकीय कामासाठी दबाव टाकल्याचा आरोप करण्यात आला आहे. दरम्यान, आरोपीने रात्री उशिरा व्हॉट्सअॅपवर अश्लील मेसेज व व्हिडिओ पाठविले. काही मेसेज डिलीट केल्याचेही फिर्यादीत म्हटले आहे. तसेच "तुझे फार वाईट हाल करीन, तुला गायब करीन," अशी धमकी दिल्याचा आरोप आहे. दि. ९ मे रोजी आरोपी तहसील कार्यालयात येऊन शिवीगाळ व धक्काबुक्की केल्याचेही फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. यावेळी सोशल मीडियावर बदनामी करण्याची धमकी देत, "तुझी मुलगी घरी एकटी राहते, तिलाही गायब करून टाकीन," अशी जीवे मारण्याची धमकी दिल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणी पाचोड पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ अंतर्गत विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### महत्वाचे ठळक मुद्दे

● सोशल मीडियावर बदनामी करण्याची धमकी ● मुलीला पळवून नेण्याची व ठार मारण्याची धमकी दिल्याचा आरोप ● तहसील कार्यालयात धक्काबुक्की केल्याची फिर्याद ● महिला मंडळ अधिकाऱ्याची पाचोड पोलीस ठाण्यात तक्रार ● व्हॉट्सअॅपवर अश्लील मेसेज व व्हिडिओ पाठवल्याचा आरोप ● शासकीय कामासाठी दबाव टाकल्याची तक्रार ● सोशल मीडियावर बदनामी करण्याची धमकी ● बीएनएसच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल




# भाटवडगावचा 'अजब विकास' चर्चेत

## गावाबाहेर सिमेंट रस्ते-नाल्या; वर्दळीच्या भागात मात्र खड्डे आणि चिखलाचा सामना

**माजलगाव / प्रतिनिधी :** माजलगाव शहरालगत असलेल्या नविन भाटवडगावमध्ये एका बाजूला सिमेंट रस्ते, नाल्या आणि वेगाने होणारा विकास दिसत असताना दुसऱ्या बाजूला नागरिकांना खड्डेमय रस्ते व नाल्यांच्या अभावामुळे मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे "गावाबाहेर विकास आणि गावातच दुर्लक्ष" अशी भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.



नविन भाटवडगावमध्ये सध्या मोठ्या प्रमाणात प्लॉटिंग व बांधकाम व्यवसाय वाढत असून अनेक मोठ्या इमारतींची कामे सुरू आहेत. परिसरातील प्लॉटचे दर चौरस फूटाला चार ते पाच हजार रुपयांपर्यंत पोहोचल्याने ग्रामपंचायतीच्या महसुलातही मोठी वाढ झाल्याचे सांगितले जाते. महसुली उत्पन्नाच्या बाबतीत भाटवडगाव ग्रामपंचायत तालुक्यात अग्रस्थानी असल्याची चर्चा आहे. मात्र, एवढा महसूल मिळूनही काही भागांकडे ग्रामपंचायत प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. विशेषतः त्रिनिटी चर्चसमोरील रस्ता तसेच त्या परिसरातील नाल्यांचा प्रश्न अद्याप प्रलंबित असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. पिताजीनगरी, आनंदनगरी (तुळजाभवानी नगर) आणि साईनगरी या भागांत सिमेंट रस्ते व नाल्यांची कामे करण्यात आली आहेत. परंतु ज्या रस्त्यावरून नागरिकांची सर्वाधिक वर्दळ असते, त्या भागात आजही मोठमोठे खड्डे, चिखल आणि नाल्यांचा अभाव दिसून येत आहे. उन्हाळा व हिवाळ्यात नागरिकांना कसेबसे या रस्त्यांवरून ये-जा करता येते. मात्र, पावसाळ्यात परिस्थिती अधिकच बिकट होते. रस्ते पूर्णपणे चिखलमय होत असल्याने वाहनचालकांना मोठा धोका निर्माण होतो. अनेकदा दुचाकी घसरून अपघात होत असल्याचे नागरिकांनी सांगितले.

"ज्या भागात फारशी वर्दळ नाही, तेथे सिमेंट रस्ते आणि नाल्या उभारल्या जातात; पण जिथे नागरिक रोजचा प्रवास करतात त्या भागाकडे दुर्लक्ष केले जाते. हा नेमका कसला विकास?" असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

तसेच संबंधित भागातील नागरिक ग्रामपंचायतीच्या हद्दीत येत नाहीत का, अथवा ते महसूल भरत नाहीत का, असा संतप्त प्रश्नही नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

भाटवडगाव ग्रामपंचायत प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्रिनिटी चर्च परिसरातील रस्ता व नालीची कामे तातडीने हाती घ्यावीत, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

### महत्वाचे ठळक मुद्दे

● नविन भाटवडगावमध्ये काही भाग विकासापासून वंचित असल्याचा आरोप ● प्लॉटिंग परिसरात सिमेंट रस्ते व नाल्या, तर मुख्य वर्दळीच्या रस्त्यांची दुरवस्था
● पावसाळ्यात नागरिकांना चिखल व अपघातांचा धोका
● ग्रामपंचायतीवर दुजाभाव केल्याची नागरिकांची नाराजी
● त्रिनिटी चर्चसमोरील रस्ता व नालीच्या कामाची मागणी

# कर्जदाराच्या कुटुंबाला तुळजाभवानी अर्बन मल्टिस्टेटची दिलासादायक मदत

## विमा संरक्षणातून कर्जाची पूर्तता; वारसांना दिले कर्जमुक्तीचे निल प्रमाणपत्र

**माजलगाव : प्रतिनिधी** तुळजाभवानी अर्बन मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी शाखा सिरसाळा यांच्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत एका कर्जदाराच्या कुटुंबाला मोठा दिलासा देणारी मदत करण्यात आली. कर्जदाराच्या निधनानंतर विमा संरक्षणाच्या माध्यमातून कर्जाची पूर्तता करून वारसांना कर्जमुक्तीचे निल प्रमाणपत्र देण्यात आले. भिलेगाव ता. परळी येथील रहिवासी कै. हाराळे देवराव अच्युत यांनी संस्थेकडून ₹२ लाखांचे पर्सनल लोन घेतले होते. मात्र, कॅन्सरसारख्या गंभीर आजाराशी झुंज देत असताना त्यांचे दुर्दैवी निधन झाले. कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळलेला असतानाच कर्जफेडीची चिंता निर्माण झाली होती. दरम्यान, संस्थेमार्फत संबंधित कर्ज खात्याचे विमा संरक्षण काढण्यात आले असल्याने विमा कंपनीकडे दावा सादर करण्यात आला. त्यानुसार विमा कंपनीने ₹२ लाख १० हजारांचा विमा दावा मंजूर केला. या रकमेतून संबंधित कर्ज खात्याची संपूर्ण पूर्तता करण्यात आली. यानंतर संस्थेच्या वतीने कै. हाराळे यांच्या वारसांना कर्जमुक्तीचे निल प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी वारसांनी संस्थेचे आभार व्यक्त करत संकटकाळात संस्थेने दिलेल्या आधाराबद्दल समाधान व्यक्त केले.



### महत्वाचे ठळक मुद्दे

● कर्जदाराच्या निधनानंतर विमा संरक्षणामुळे कुटुंबाला मोठा दिलासा
● ₹२ लाखांच्या कर्जावर ₹२.१० लाखांचा विमा दावा मंजूर
● संस्थेकडून वारसांना कर्जमुक्तीचे निल प्रमाणपत्र प्रदान
● सामाजिक बांधिलकी जपत सदस्यांच्या पाठीशी उभे राहण्याची भूमिका अधोरेखित

सदस्यांच्या अडचणीच्या काळात त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याची संस्थेची भूमिका समाजासाठी प्रेरणादायी असल्याची भावना यावेळी उपस्थितांकडून व्यक्त करण्यात आली.

## दुग्ध उत्पादन व्यवसायातून स्वयंरोजगार सुलभ निर्मिती

● पान ४ वरून...

व्यवसाय करत आहोत चांगले सिमेन वापरून उत्तम कालवडी निर्माण करा पहिल्या दिवसापासून काळजी घ्या आजची कालवड उद्याची गाय आहे शास्त्रोक्त पद्धतीने पशुखाद्याचा आहार द्यावा आष्टी तालुक्यातील दूध उत्पादकांना आम्ही कधीही मार्गदर्शन आणि सहकार्य करण्यास तयार आहोत असे त्यांनी शेवटी सांगितले. यावेळी महानंद दूध महासंघ मुंबई संचालिका प्राजक्ताताई धस, राजहंस दुध संघ संगमनेरचे व्हा. चेअरमन. राजेंद्र चकोर राजहंस दुध संघ संगमनेरचे संचालक विक्रमराजे थोरात, विलासराव कवडे, डॉ. प्रमोद पावसे आष्टी तालुका दूध संघाचे चेअरमन शांतिलाल भोसले, व्हाइस चेअरमन अशोक गर्जे, मच्छिंद्र धनवडे, सभापती बद्रीनाथ जगताप, आत्माराम फुंदे, मोहन झांबरे, दिनकर दानी, गणेश मोकाशे, गोकुळ कोकणे, डॉ. संतोष शेळके, भरत सुळे, शिवाजी घोलप, माऊली जरांगे, डॉ. जालिंदर वांढरे, चंद्रकांत भोसले, या सह दूध संघाचे अधिकारी, पदाधिकारी, कर्मचारी वृंद तसेच दूध उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# द ग्रेट टेपू सुलतान युवा मंच ची बीड जिल्हा कार्यकारिणी बरखास्त

## नवीन समितीचा लवकरच विस्तार इम्रान इनामदार

**गेवराई : प्रतिनिधी** द ग्रेट टेपू सुलतान युवा मंचच्या बीड जिल्हा कार्यकारिणीला बरखास्त करण्यात आल्याची माहिती संघटनेचे संस्थापक अध्यक्ष इम्रान इनामदार यांनी दिली. संघटनेच्या कार्यपद्धतीत आवश्यक बदल करून नव्या उत्साहाने संघटनात्मक कामकाज सुरू करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

इम्रान इनामदार यांनी सांगितले की, बीड जिल्ह्यात संघटनेचे कार्य अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी तसेच युवकांना संघटनेशी जोडण्यासाठी नवीन जिल्हा कार्यकारिणीची स्थापना लवकरच करण्यात येणार आहे.



नव्या समितीत जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील सक्रिय आणि सामाजिक कार्यात पुढाकार घेणाऱ्या कार्यकर्त्यांना संधी दिली जाणार आहे.

तसेच संघटनेच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक आणि युवकांसाठी उपयुक्त विविध उपक्रम राबविण्यावर भर दिला जाणार असून, नवीन समितीचा विस्तार लवकरच जाहीर केला जाईल, अशी माहितीही त्यांनी दिली. बीड जिल्ह्यातील सर्व कार्यकर्त्यांनी संघटनेच्या पुढील निर्णयांना सहकार्य करावे तसेच सामाजिक कार्यासाठी संपर्क साधावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# ह.भ.प. राजू महाराज लोखंडे यांना राज्यस्तरीय महाराष्ट्र भूषण पुरस्काराने गौरव

## पद्मश्री डॉ. तात्यासाहेब लहाने व अभिनेत्री मेघना झुझम यांच्या हस्ते सन्मान

**आष्टी : प्रतिनिधी** अध्यात्म, तर्कशास्त्र, समाजप्रबोधन आणि पर्यावरण जनजागृतीच्या माध्यमातून समाजमनावर अधिराज्य गाजवणारे ह.भ.प. राजू महाराज लोखंडे यांना दैनिक लोकनेता वर्धापन दिनानिमित्त आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा २०२६ मध्ये प्रतिष्ठेचा "महाराष्ट्र भूषण" पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. पद्मश्री डॉ. तात्यासाहेब लहाने व प्रसिद्ध अभिनेत्री मेघना झुझम यांच्या हस्ते हा सन्मान प्रदान करण्यात आला.

परळी वैजनाथ येथील हॉटेल भागवत पॅलेस येथे रविवारी (दि.१० मे २०२६) आयोजित दिमाखदार राज्यस्तरीय सोहळ्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यात आला. यामध्ये अध्यात्मिक व समाजोपयोगी कार्यामुळे राज्यभर विशेष ओळख निर्माण करणारे ह.भ.प. राजू महाराज लोखंडे यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या राजू महाराज लोखंडे यांचे प्राथमिक शिक्षण जामखेड तालुक्यातील दिघोळ येथील जिल्हा परिषद शाळेत झाले. बालपणापासूनच अध्यात्माची ओढ असलेल्या महाराजांनी पुढे एम.ए. पर्यंत शिक्षण पूर्ण केले. पाटोदा येथे स्थायिक झाल्यानंतर त्यांनी खेमानंद महाराजांचे शिष्यत्व स्वीकारले. तसेच वैराग्यमूर्ती ह.भ.प. रामकृष्ण रंधवे महाराज यांच्या संस्थेत काही काळ सेवा देत अध्यात्मिक साधनेत स्वतःला पूर्णतः समर्पित केले.

ब्रह्मचारी वृत्तीने जीवन जगत असताना त्यांनी तर्कशास्त्रावर आधारित विलक्षण अभ्यास आत्मसात केला. कोणताही औपचारिक ज्योतिषशास्त्रीय अभ्यास नसतानाही केवळ तर्कशक्तीच्या आधारे व्यक्तींच्या जन्मतारखा, वार आणि आयुष्यातील संभाव्य घटनांचा अचूक अंदाज व्यक्त करण्याच्या त्यांच्या अनोख्या क्षमतेमुळे ते राज्यभर चर्चेचा विषय ठरले आहेत. अनेक राजकीय व सामाजिक घडामोडींवरील त्यांच्या भाकितांची अचूकता अनुभवास आली असून समाजात त्यांच्याविषयी विशेष आदर निर्माण झाला आहे.

विशेष म्हणजे नैराश्यात अडकलेल्या व्यक्तींना सकारात्मक जीवनदृष्टी देत आत्महत्येसारख्या टोकाच्या विचारांपासून परावृत्त करण्याचे मोलाचे समाजकार्य ते सातत्याने करीत आहेत. अध्यात्मिक मार्गदर्शनासोबतच सामाजिक सलोखा, पर्यावरण




संवर्धन आणि जनजागृतीच्या उपक्रमांतून ते समाजात नवचैतन्य निर्माण करीत आहेत. त्यांच्या कार्यातून अनेकांना नवी प्रेरणा आणि जगण्याची दिशा मिळत असल्याची भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली. यापूर्वीही त्यांना "समाजरत्न पुरस्कार २०२५", "लोकरत्न पुरस्कार २०२६" तसेच "गंगाई-बाबाजी समाजभूषण पुरस्कार २०२५" यांसारखे मानाचे पुरस्कार प्राप्त झाले आहेत. आता "महाराष्ट्र भूषण" पुरस्काराने त्यांच्या कार्याचा आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

या पुरस्काराबद्दल आ. सुरेश धस, उद्योजक परमेश्वर शेठ येवले (इंदौर), शिवसेना उपजिल्हाप्रमुख गणेश उगले, सतीश शेळके, संजय पवार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी ह.भ.प. राजू महाराज लोखंडे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला. या सोहळ्यास परळी शहरचे पोलिस निरीक्षक श्री. नाचन, जी.व्ही.टी. संस्थापक मयंक गांधी, नायब तहसीलदार पठाण मॅडम, साहित्यिक नागेश शंकर शेलार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

दैनिक लोकनेताचे मुख्य संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केले. सहसंपादक अण्णासाहेब साबळे, निवासी संपादक प्रदीप मुंडे, उपसंपादक विजय रोडे, प्रतिनिधी हनुमंत गुट्टे व प्रविण फड यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

सामाजिक बांधिलकी, जनसंपर्क आणि समाजातील प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांचा गौरव करणारा हा राज्यस्तरीय सोहळा उपस्थितांसाठी संस्मरणीय व प्रेरणादायी ठरला.

सांज दैनिक बीड वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक - जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक -अरविंद ओव्हाळ** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद-विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

अनेक अडचणींवर मात करत त्यांनी आपल्या मेहनतीच्या बळावर यश संपादन

ग्राहकांचा विश्वास हेच कामाचं सर्वात मोठं बळ मानत त्यांनी सदैव दर्जेदार सेवा देण्यावर भर

# राज्यस्तरीय सौंदर्य कला पुरस्काराने सौ. पूजा शेळके यांचा गौरव

दिंद्रुड : प्रतिनिधी
मेहनत, जिद्द, कला आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर स्वप्नांना यशाची सुंदर किनार मिळते, याची प्रचिती माजलगाव तालुक्यातील नाकलगावच्या सौ. पूजा संभाजी शेळके यांनी करून दिली आहे. बी. द. चेंज फाउंडेशन, शिर्डी यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या "राज्यस्तरीय सौंदर्यकला पुरस्कार २०२६" मध्ये सौ. पूजा शेळके यांना "बेस्ट हेअर स्टायलिस्ट" हा मानाचा पुरस्कार प्रदान करून रविवारी गौरविण्यात आले.

### सौंदर्य क्षेत्रात त्यांनी केलेले उत्कृष्ट कार्य, नावीन्यपूर्ण शैली!

सौंदर्य क्षेत्रात त्यांनी केलेले उत्कृष्ट कार्य, नावीन्यपूर्ण शैली, ग्राहकांप्रती असलेली आत्मीयता आणि आपल्या व्यवसायातील सचोटी याची दखल घेत हा पुरस्कार देण्यात आला. ग्राहकांचा विश्वास हेच आपल्या कामाचं सर्वात मोठं बळ मानत त्यांनी सदैव दर्जेदार सेवा देण्यावर भर दिलेला आहे. याची दखल बी. द. फाऊंडेशन ने घेत हा सन्मान बहाल केला.

### कामात प्रामाणिकपणा, मनात सेवा भाव असेल, तर यश पाठीशी उभं राहतं!

कामात प्रामाणिकपणा आणि मनात सेवा भाव असेल, तर यश आपोआप आपल्या पाठीशी उभं राहतं," हे त्यांनी आपल्या कार्यातून सिद्ध करून दाखवले आहे. अनेक अडचणींवर मात करत त्यांनी आपल्या मेहनतीच्या बळावर हे यश संपादन केले आहे.
त्यांच्या या यशामुळे केवळ कुटुंबाचाच नव्हे, तर संपूर्ण परिसराचा अभिमान उंचावला आहे. सौंदर्य क्षेत्रात सचोटी, गुणवत्ता आणि ग्राहकांचा विश्वास जपणाऱ्या पूजा शेळके या अनेक महिलांसाठी प्रेरणास्थान ठरत आहेत.



### संघर्षाशिवाय यश नाही आणि मेहनतीशिवाय ओळख नाही!!

संघर्षाशिवाय यश नाही आणि मेहनतीशिवाय ओळख नाही," या विचारांना साकार करत त्यांनी मिळवलेला हा सन्मान अनेकांना नवी प्रेरणा देणारा ठरत आहे. हा पुरस्कार सोहळा १७ मे २०२६ रोजी शिर्डी, जिल्हा अहिल्यानगर येथे उत्साहात पार पडला.

### शिक्षण आत्मविश्वास देतं, पण आर्थिक साक्षरता महिलेला स्वत:च्या पायावर उभं राहण्याची ताकद देते!!

आजच्या आधुनिक काळात महिला केवळ साक्षर होणं पुरेसं नाही, तर ती आर्थिकदृष्ट्याही सक्षम आणि स्वावलंबी होणं ही काळाची गरज आहे, असं माझं ठाम मत आहे. शिक्षण आत्मविश्वास देतं, पण आर्थिक साक्षरता महिलेला स्वत:च्या पायावर उभं राहण्याची ताकद देते. याच विचारातून मी माझ्या पत्नी पूजा शेळके हिला "हिंदवी लेडीज शॉपी" या नावाने ब्युटी पार्लर व्यवसाय सुरू करून दिला. तिनेही त्या विश्वासाचं सोनं करत स्वत:ला पूर्णपणे या क्षेत्रात समर्पित केलं. मेहनत, प्रामाणिकपणा, ग्राहकांप्रती असलेली सचोटी आणि कलेप्रती असलेलं प्रेम यांच्या जोरावर तिने स्वत:ची एक वेगळी ओळख निर्माण केली.
आज तिच्या कार्याची दखल घेत Be The Change Foundation यांनी तिला "राज्यस्तरीय सौंदर्य कला पुरस्कार" देऊन सन्मानित केलं, हा आमच्या कुटुंबासाठी अत्यंत अभिमानाचा आणि प्रेरणादायी क्षण आहे.

### एका स्त्रीला फक्त साथ नाही, तर विश्वास आणि संधी मिळाली तर ती स्वत:चं विश्व निर्माण करू शकते!!

एका स्त्रीला फक्त साथ नाही, तर विश्वास आणि संधी मिळाली तर ती स्वत:चं विश्व निर्माण करू शकते, याचं जिवंत उदाहरण म्हणजे माझी पत्नी पूजा शेळके. तिच्या यशामागे तिची जिद्द, संघर्ष आणि मेहनत आहे, आणि तिचा जीवनसाथी म्हणून मला तिचा मनापासून अभिमान वाटतो.
— **संभाजी शेळके**
(पूजा शेळके यांचे पती)

# भर कार्यक्रमात महसूलमंत्र्यांना कागदाने वारा! जनता दरबारातील 'तो' व्हिडिओ चर्चेत



अमरावती : राज्याच्या राजकीय वर्तुळात सध्या एका अनोख्या व्हिडिओची जोरदार चर्चा रंगली आहे. अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या 'जनता दरबार' कार्यक्रमात भाजपच्या महिला शहराध्यक्षा मेघा भारती यांनी चक्क महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना कागदाने वारा घातल्याचा प्रकार समोर आला आहे. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर वाऱ्यासारखा पसरला असून, त्यावर विविध प्रतिक्रिया उमटत आहेत.

### नेमका प्रकार काय?

दर्यापूर येथे नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी आणि त्यांच्या प्रलंबित तक्रारींचे निवारण करण्यासाठी स्थानिक प्रशासन आणि महसूलमंत्र्यांच्या उपस्थितीत एका जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात मंत्री बावनकुळे हे नागरिकांच्या तक्रारी ऐकून घेत त्यांच्याशी संवाद साधण्यात मग्न होते. मात्र, याच वेळी त्यांच्या शेजारी उभ्या असलेल्या भाजपच्या महिला शहराध्यक्षा मेघा भारती यांनी हातात एक कागद घेतला आणि त्या चक्क मंत्र्यांना वारा घालू लागल्या. भर कार्यक्रमात घडलेल्या या प्रकारामुळे उपस्थितांच्या भुवया उंचावल्या.
बावनकुळेंनी तात्काळ रोखले अन् शिष्टाचाराची आठवण करून दिली
विशेष म्हणजे, मेघा भारती वारा घालत असल्याचे लक्षात येताच मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी क्षणाचाही विलंब न लावता त्यांना तसे करण्यापासून रोखले. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मंत्र्यांनी त्यांना सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये शिष्टाचार आणि प्रोटोकॉल पाळण्याची सक्त सूचनाही दिली. मंत्र्यांनी स्वत: हस्तक्षेप करून हा प्रकार तत्काळ थांबवला असला तरी, तोपर्यंत ही घटना कॅमेऱ्यात कैद झाली होती. त्यानंतर अल्पावधीतच हा व्हिडिओ सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर व्हायरल झाला आणि राजकीय चर्चांना उधाण आले.

### सोशल मीडियावर नेटकऱ्यांच्या संमिश्र प्रतिक्रिया

या व्हायरल व्हिडिओवर सोशल मीडिया वापरकर्त्यांकडून संमिश्र प्रतिक्रिया पाहायला मिळत आहेत. एका बाजूला, अनेकांनी या घटनेवर सडकून टीका केली असून हा केवळ अतिउत्साह आणि अनावश्यक राजकीय खुशामत करण्याचा प्रकार असल्याचे म्हटले आहे. तर दुसऱ्या बाजूला, काही लोकांनी बावनकुळे यांच्या तत्परतेचे कौतुक केले आहे; मंत्र्यांनी स्वत: या कृतीला प्रोत्साहन न देता वेळीच रोखल्याने त्यांनी एक चांगला संदेश दिल्याची भावना काही युजर्सनी व्यक्त केली आहे.
सध्या राज्यभरात आढावा बैठका आणि जनसंपर्क मोहिमांमध्ये व्यस्त असलेल्या बावनकुळे यांनी नुकतीच मुंबईतही अधिकाऱ्यांची कानउघाडणी केली आहे. १५ मे रोजी मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित केलेल्या आढावा बैठकीत त्यांनी महसूल विभागाला अधिक लोकाभिमुख आणि पारदर्शक कारभार करण्याचे स्पष्ट निर्देश दिले. या महत्त्वाच्या बैठकीला कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार विक्रांत पाटील, मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी सौरभ कट्यार आणि विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. महसूल विभाग हा नागरिकांच्या दैनंदिन समस्या आणि मालमत्तेच्या अधिकारांशी थेट जोडलेला असतो, याची आठवण करून देत बावनकुळे यांनी अधिकाऱ्यांना काही महत्त्वाच्या सूचना दिल्या.
प्रशासनाने स्वत:हून स्थानिक पातळीवर दौरे करावेत, तळागाळातील जनतेच्या समस्या समजून घ्याव्यात आणि योग्य नियोजनाच्या माध्यमातून त्या जलद गतीने सोडवाव्यात, असे आदेश त्यांनी या बैठकीत दिले आहेत.

# दुग्ध उत्पादन व्यवसायातून स्वयंरोजगार सुलभ निर्मिती

**पंजाब येथील डेअरी फार्मर इन्फ्लुएंसर प्रशिक्षक आणि सल्लागार हरप्रीत सिंग यांचे प्रतिपादन**

**युवकांनी शेतकरी उद्योजक व्हावे.. - आ.सुरेश धस**

**आष्टीत दूध उत्पादन वाढ मेळाव्यामध्ये हजारोंची उपस्थिती**







आष्टी / प्रतिनिधी
दुग्ध उत्पादन व्यवसाय हा युवकांसाठी अतिशय सुलभ व्यवसाय असून स्वयंरोजगार निर्मितीसाठी अत्यंत उपयुक्त आहे असे प्रतिपादन पंजाब येथील डेअरी फार्मर इन्फ्लुएंसर प्रशिक्षक आणि सल्लागार हरप्रीत सिंग यांनी केले.
युवकांनी नोकरीच्या मागे न लागता दूध उत्पादन व्यवसायामध्ये नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून अत्याधुनिक पद्धतीने दुग्ध व्यवसाय करून शेती उद्योजक व्हावे असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले.
आष्टी येथील आष्टी तालुका दूध उत्पादक पुरवठा सहकारी संघ यांचे वतीने आयोजित पशुसंवर्धन व दूध उत्पादन वाढ मार्गदर्शन मेळाव्यामध्ये प्रमुख मार्गदर्शन करताना ते बोलत होते यावेळी व्यासपीठावर आमदार सुरेश धस महानंद मुंबईचे संचालक रणजीत देशमुख भटिंडा पंजाब येथील दुग्ध व्यवसायिक आणि पशुखाद्य विशेषज्ञ संदीप सिंग आणि त्यांचे बंधू डेअरी फार्मर इन्फ्लुएंसर प्रशिक्षक आणि सल्लागार हरप्रीत सिंग उपस्थित होते सुरुवातीस संदीप सिंग यांनी दुग्ध व्यवसायातील यशस्वीतेसाठी पशुखाद्य महत्त्वाचे असून गेली पंधरा वर्षे आपण संशोधन करून ६७ किलो वजनाची कालवड निर्माण करण्यात यशस्वी झालो असून यापुढे आणखी संशोधन करणार आहोत पशुखाद्यामध्ये मुरघास हा महत्त्वाचा असून मका आणि प्रोटीन यावर भर देण्यात यावा दुधाळ गाय ज्यादा वजनाची होऊ नये याची काळजी घ्यावी कोरडा चारा देण्यात यावा कालवडीचे वयाप्रमाणे सहा महिने वजन वाढीप्रमाणे आहार देण्यात यावा कालवडींची जोपासना शास्त्रोक्त पद्धतीने केल्यास १३ ते १५ महिन्यात ३५० किलो वजन प्राप्त करून कालवड गाभण करणे योग्य होते अशाप्रकारे नियोजन करण्यात यावे असे सांगितले आमदार सुरेश धस पुढे बोलताना म्हणाले आपण आष्टी तालुक्यातील सर्वात मोठा गाय गोठा केला असून त्या ठिकाणी अत्यंत शास्त्र प्रमाणे गाईंचे कालवडींचे संगोपन होत आहे तालुक्यातील शेतीला पर्याय म्हणून दूध उत्पादन हा सर्वोत्तम व्यवसाय असून युवकांनी नोकरीच्या मागे न लागता शेती उद्योजक व्हावे यासाठी नवनवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करून दूध उत्पादन व्यवसायाकडे वळले पाहिजे दूध उत्पादकांनी जागरूक व्हावे पंजाब मध्ये लागवड केलेल्या गाई आणू नयेत कारण अत्यंत हलक्या दर्जाच्या गाई इकडे येत आहेत मुरघास निर्मिती करावी परंतु यापुढे भोतातला मुरघास वापरू नये करून या मुरघासामुळे स्तनदाह होत आहे त्यामुळे यापुढे जमिनीमध्ये तीन ताली खोदून खाली गावाचे कार्ड सोयाबीन तूर कडबा यापैकी वापरून त्यावर मुरघास करावा तसेच मुक्त गोठा तयार करून गाईंना सोड बांध बंद करा गाईंचे नुसते पोट भरू नका १२ ही महिने त्यांना मुरघासच द्यावा ८० टक्के मुरघास अधिक वीस टक्के सोयाबीन सरकी पाच टक्के असा खुराक देण्यात यावा कालवड संगोपनातून मोठ्या प्रमाणावर अर्थप्राप्ती होत आहे डब्ल्यू डब्ल्यू एस एबीएस आरमाडा ऑस्कर किंवा रँग्लर अशा चांगल्या पद्धतीचे दर्जेदार सिमेन वापरा जगात सर्वात जास्त होलस्टीन फ्रिजर या जातीच्या गायीपासून दूध निर्मिती केली जाते आम्ही लवकरच गाय तुमची कालवड आमची अशी योजना आणणार असून ती दूध उत्पादक शेतकऱ्यांना फायदेशीर आहे तसेच शासनाद्वारे लवकरच पाच गाईंचा गोठा अकरा लक्ष रुपये योजना सुरू करण्यात येणार आहे त्याचाही युवकांनी फायदा घ्यावा असे आवाहन करून उपस्थित दूध उत्पादकांपैकी माझ्याकडे ४१ लिटर दूध देणारी गाय असून ४२ लिटर तसेच ४० लिटर ३५ लिटर दूध देणाऱ्या गाई मालकांचा सत्कार यावेळी करण्यात आला
हरप्रीत सिंग पुढे बोलताना म्हणाली की दुग्ध व्यवसाय हा व्यवसाय पद्धतीने केला पाहिजे डेरी फार्मिंग ही जीवनस्तर उंचावण्यासाठी सर्वोत्तम योजना असून छोट्या शेतकऱ्यांनी देखील चांगले तंत्रज्ञान वापरून अत्याधुनिक पद्धतीने दुग्ध व्यवसाय करावा उत्पादन वाढवावे या व्यवसायाचे विशेष म्हणजे अगदी छोट्या स्वरूपातून याचा हा व्यवसाय सुरू करता येतो नोकरीला हा पर्याय असून स्वयं रोजगार निर्मितीसाठी अत्यंत उपयुक्त आहे दूध व्यवसायाला कधीही तुटवडा भासणार नाही दुधाला प्रचंड मागणी असून विना भेसळ दूध निर्मितीद्वारे युवकांनी रोजगार निर्माण करावा मार्गदर्शन करण्यासाठी आपल्या वेबसाईटवर सर्व माहिती उपलब्ध असून त्याद्वारे दूध उत्पादक शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात येईल आमदार सुरेश धस यांचे कौतुक करताना ते म्हणाले की आम्ही दोन दिवस त्यांचे काम पाहत आहोत आणि ते देखील आमच्याकडे पंजाब मध्ये येऊन दूध उत्पादक शेतकऱ्यांना भेटले आहेत ते शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी प्रचंड मेहनती असलेले आमदार आहेत असे ते म्हणाले त्यावेळी बोलताना महानंद मुंबईचे संचालक रणजीत देशमुख म्हणाले की आमदार सुरेश धस हे केवळ मराठवाडा भूषण नसून ते महाराष्ट्र भूषण ठराविक इतके त्यांनी काम केलेले आहे हे अत्यंत कणखर आणि निर्भीड नेतृत्व असून हा दूध उत्पादन वाढ मेळावा हा ऐतिहासिक असून दूध व्यवसायास वेगळी दिशा मिळणारा हा दिवस असून बीड जिल्ह्याची ही दुसरी चांगली बाजू देखील महाराष्ट्राला पाहायला मिळणार आहे आमदार सुरेश धस हे अत्यंत अभ्यासू नेतृत्व असून दूध व्यवसाय विषयी त्यांचा दांडगा अभ्यास आहे दूध उत्पादकांची ते प्रभावी बाजू मांडताना आम्ही पाहिलेले आहे आष्टी सारख्या दुष्काळी तालुक्यात त्यांच्या मार्गदर्शनामुळेच मोठ्या प्रमाणावर दूध उत्पादन होत आहे असे सांगत दूध उत्पादकांना मार्गदर्शन दूध उत्पादकांनी आता बदल केला पाहिजे सर्वात महत्त्वाचे मुक्त संचार गोठा करावा मानसिकता बदलून हा शेतीचा जोड धंदा नव्हे तर एक उद्योग म्हणून याकडे पहावे दूध व्यवसाय करताना प्रत्येक हिशोब जमाखर्च देऊन ठेवा खर्च आणि उत्पादन याचा ताळमेळ ठेवा संगमनेर तालुक्यामध्ये आम्ही मिशन ५० लिटर असे धोरण ठेवले असून शेतकऱ्यांच्या दारात ५० लिटर दूध देणारी गाय उभी राहिली पाहिजे युरोपियन देशांमध्ये साठ लिटर्स देणारे गावी आहेत पंजाब मध्ये देखील आता ६२ लिटर्स दूध देणारी गाय संदीप सिंग आणि हरप्रीत सिंग यांनी निर्माण केली आहे पंजाब मधील प्रदर्शनामध्ये ८७ लिटर दूध देणारी गाय सध्या उपलब्ध असून पुढील दहा वर्षांनी आणखी वाढ होणार आहे गेली 25 वर्ष यामध्ये संशोधन झाले असून आम्ही देखील सहकारातून उत्तम पद्धतीने ● पान ३ वर...

**राज्यस्तरीय सन्मान** ➤ "सेवा हीच खरी ओळख" या भावनेतून सातत्याने केले समाजकार्य

# कन्नडचा अभिमान डॉ. सदाशिव पाटील यांना गुणगौरव पुरस्कार

➤ **कन्नड / प्रतिनिधी :**
शिर्डी (ता. राहता, जि. अहिल्यानगर) — "सेवा हीच खरी ओळख" या भावनेतून समाजकार्यात सातत्याने कार्य करणाऱ्या कन्नड शहरातील समाजसेवक डॉ. सदाशिव पाटील यांना बी दि चेंज फाउंडेशन तर्फे आयोजित महाराष्ट्र राज्यस्तरीय गुणगौरव पुरस्कार ने सन्मानित करण्यात आले. रविवार, दिनांक १७ मे रोजी सकाळी ११ वाजता, शिर्डी येथील साई पालखी हॉल मध्ये हा भव्य सोहळा उत्साहात पार पडला. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या विविध क्षेत्रातील मान्यवर आणि समाजकार्यातील सक्रिय कार्यकर्त्यांचा यावेळी गौरव करण्यात आला.



या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त सुभेदार मेजर संजय कुमार (इंडियन आर्मी) यांची उपस्थिती लाभली. तसेच अभिनेत्री निवेदिता पगार यांच्या शुभहस्ते डॉ. पाटील यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.
समाजसेवेची उज्ज्वल कामगिरी
डॉ. सदाशिव पाटील हे कन्नड शहर व तालुक्यातील एक परिचित आणि सक्रिय समाजसेवक म्हणून ओळखले जातात. त्यांनी— शेतकऱ्यांसाठी कापसाच्या योग्य दरासाठी लढा गारपीट व अतिवृष्टी नुकसानभरपाईसाठी आंदोलने पीक विमा मिळवून देण्यासाठी पाठपुरावा कन्नड–चाळीसगाव घाटातील बोगद्याच्या कामासाठी मुंबई, दिल्ली व छत्रपती संभाजीनगर येथे निवेदने स्वखर्चाने स्वच्छता मोहीम मोकाट जनावरे व कुत्र्यांवर नियंत्रण, नागरिकांना स्वच्छ पाणी व आरोग्य सुविधाअपघातग्रस्तांना तात्काळ मदत, . अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केले आहे.

**मान्यवरांची उपस्थिती**

● या सोहळ्यास पोलीस निरीक्षक संदीप कोळी (कोपरगाव) नायब तहसीलदार प्रफुलिता सातपुते त्रिदल सैनिक संघ, नाशिकचे कार्याध्यक्ष अरुण भंडारे अभिनेत्री/मॉडेल निवेदिता पगार आंतरराष्ट्रीय व्यवसाय सल्लागार व संशोधक कैलास गडाख पुणे येथील उद्योजक संजय वाबळे महसूल सल्लागार सुरेश घोडके मेकअप आर्टिस्ट शुभांगी थोरात बी दि चेंज फाउंडेशन चे अध्यक्ष मयूर डगले व इतर पदाधिकारी "समाजासाठी झटणाऱ्यांच्या पाठीवरची ही शाबासकी आहे" — अशा शब्दांत उपस्थितांनी डॉ. पाटील यांच्या कार्याचे कौतुक केले. कन्नड शहरासाठी हा अभिमानाचा क्षण ठरला आहे.

### सेवाभावी वृत्तीला सन्मान

वैद्यकीय व्यवसायासोबतच सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातही सक्रिय असलेल्या डॉ. पाटील यांच्या कार्याची दखल घेत हा सन्मान देण्यात आला. या पुरस्कारामुळे त्यांच्या कार्याला अधिक बळ मिळणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.